# Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेस नोट ता.२३/०२/२०२०**

**चौदा वर्ष पोलीस रेकॉर्डवर पाहीजे आरोपीस अटक**

**गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई**

दिनांक २२/०२/२०२० रोजी गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस कॉंस्टेबल बक्कल नंबर १९२० अजित सानप यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराकरवी मिळाले बातमीवरुन निगडी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ३०/२००६ भा.द.वि.स.कलम ३८०,३४ प्रमाणे दाखल गुन्हयामध्ये गेले १४ वर्षापासुन पोलीस रेकॉर्डवर पाहीजे असलेला आरोपी नामे सुनिल हणमंत जाधव वय ४८ वर्षे व्यवसाय- रिक्षा चालक रा.राघोबा पाटील नगर खराडी पुणे हा मुंढवा परिसरात राहत असल्याची माहीती मिळालेने त्याचा शोध घेवून युनिट २च्या पथकाने आरोपीत यास मुंढवा परीसरातुन ताब्यात घेवून गुन्हयाचेकामी निगडी पोलीस ठाणेकडे हजर केले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री आर आर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट २ चे पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक निलपत्रेवार, सहा.पो.फौजदार दिलीप चौधरी, संपत निकम, संजय पंधरे, पोहवा. शिवानंद स्वामी, केराप्पा माने, मपोहवा उषा दळे, पोना विपूल जाधव, चेतन मुंढे, आतिष कुडके, शिवाजी मुंडे ,अजित सानप ,नामदेव राऊत, यांचे पथकाने केली.